पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुणे

24th December 2011

# रसिकांशी चित्रपटांवर चर्चा व्हावी : निहलानी

## आशियाई चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन

**पुणे : प्रतिनिधी**

चित्रपट महोत्सवांमध्ये केवळ चित्रपट प्रदर्शित करणे एवढाच हेतू मर्यादित राहू नये. एक पाऊल पुढे जाऊन महोत्सवांमध्ये चित्रपटांवर चर्चा करण्यात यावी. जागतिक पातळीवर सध्या ही पद्धत अवलंबली जात असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे, असे प्रतिपादन दिग्दर्शक गोविंद निहलानी यांनी केले.

आशियाई चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन निहलानी यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आशियाई फिल्म फाउंडेशनचे अध्यक्ष किरण व्ही. शांताराम, अभिनेता अश्मित पटेल, सतीश जकातदार, वीरेंद्र चित्राव, फिल्म अँड टेलिव्हिजन संस्थेचे संचालक डी. जे. नारायण, गोविंद ठकार आदी उपस्थित होते.

निहलानी म्हणाले, प्रतिक्रियात्मक चर्चांमुळे रसिकांची चित्रपटांमधील अभिरुची वाढते. ही पद्धत येथील चित्रपट महोत्सवांमध्येही अवलंबण्यात यावी. तसेच चित्रपट महोत्सव ही आता चळवळ बनत आहे. पूर्वी केवळ दोन शहरांपुरता मर्यादित असणारा आशियाई चित्रपट महोत्सव आता इतर शहरांमध्येही होऊ लागला आहे.

किरण शांताराम म्हणाले, आशियाई दिग्दर्शकांमध्ये भारतीयांची संख्या लक्षणीय आहे, त्यामुळे आशियाई महोत्सव आयोजित करण्याचे ठरविले. भारतात बहुतांश महोत्सव हे आंतरराष्ट्रीय म्हणून होतात. आशियाई म्हणून होणारा हा देशातील एकमेव महोत्सव आहे.

महोत्सवामध्ये २३ ते २९ डिसेंबरदरम्यान १५ देशांतील सुमारे ८० चित्रपट दाखविण्यात येणार आहेत. अफगाणिस्तानचे दिग्दर्शक सिद्दीक बर्माक यांच्या ओपियम वॉर या चित्रपटाने महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. हेलिकॉप्टर अपघातात फसलेल्या दोन अमेरिकन जवानांची जगण्याची धडपड आणि त्यावर अफगाणिस्तानच्या डोंगराळ भागातील एका कुटुंबामध्ये उमटणाऱ्या प्रतिक्रिया याभोवती या चित्रपटाचे कथानक फिरते. उद्‌घाटनाच्या या चित्रपटामध्ये अव्यावसायिक, हौशी अभिनेत्यांच्या कामाला प्रेक्षकांनी दाद दिली.




**आशियाई चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन दिग्दर्शक गोविंद निहलानी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फिल्म अँड टेलिव्हिजन संस्थेचे संचालक डी. जे. नारायण, निहलानी, किरण शांताराम, अश्मित पटेल आदी.**